महासागर ●गुरुवार,दि.९ ऑक्टोबर २०२५



# अकोला पोलीस दलात दुसरी मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन कार्यान्वित गुन्हे अन्वेषणाला नवे तंत्रज्ञानाचे बळ

**अकोला :** ८ ऑक्टोबर २०२५ पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक यांच्या हस्ते अकोला जिल्ह्यात गुन्हे अन्वेषणासाठी अत्याधुनिक पाऊल उचलण्यात आले आहे. आज पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक यांच्या हस्ते श्रीमती वैशाली मुले उपविभागीय पोलीस अधिकारी मुर्तीजापूर विभाग यांचे उपस्थितीत पोलीस अधीक्षक कार्यालय अकोला येथे हिरवी झेंडी दाखवून मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन कार्यान्वित करण्यात आली.भारतीय नागरी सुरक्षा संहिता, २०२३ अंतर्गत ही सुविधा उपलब्ध झाली असून न्या. वै. प्र. संचालनालय, मुंबई यांच्या आदेशानुसार आणि सी.एस.एम. कॉम्प्युटर्स इंडिया लिमिटेड, मुंबई यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी, मुर्तीजापूर यांच्या कार्यालयाकरिता वाहन क्रमांक चक १२ धक ९४४२ प्राप्त झाले असून, इतर विभागांनाही टप्प्याटप्प्याने अशा सुविधा देण्यात येणार आहेत. या फॉरेन्सिक व्हॅनमध्ये अत्याधुनिक किट्स, रसायने, नमुने गोळा करण्याची साधने उपलब्ध असून तज्ज्ञांच्या टीमची नेमणूक करण्यात आली आहे.

## युवकांना नव्या युगातील कौशल्यांचे प्रशिक्षण; पंतप्रधानांच्या हस्ते शुभारंभ

# युवा शक्तीचे कुशल मनुष्यबळात परिवर्तन घडेल : खा.अनुप धोत्रे

■अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :

देशात युवकांची संख्या मोठी आहे. केंद्र व राज्य शासनाकडून युवकांसाठी नव्या युगातील उत्तमोत्तम कौशल्यांचे प्रशिक्षण व रोजगारवृद्धीसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. काळानुरूप कौशल्य प्राप्त झाल्यामुळे युवा शक्तीचे कुशल मनुष्यबळात परिवर्तन घडेल, असा विश्वास खासदार अनुप धोत्रे यांनी आज येथे व्यक्त केला. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागातर्फे 'मुख्यमंत्री अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम' या अभिनव उपक्रमाचे ऑनलाईन उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. त्यानुसार अकोला येथील आयटीआय येथे खा. धोत्रे यांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय कार्यक्रम झाला, त्यावेळी ते बोलत होते.





आमदार वसंत खंडेलवाल, जिल्हा रोजगार सहायक आयुक्त प्रफुल्ल शेळके, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्राचार्य संतोष साळुंखे, आयटीआयचे प्राचार्य शरदचंद्र ठोकरे. विश्वकर्मा लाभार्थी ग्यानबा तुकाराम बळकार, निदेशक अरविंद पोहरकर आदी यावेळी उपस्थित होते. खासदार श्री. धोत्रे म्हणाले की, युवकांचा कौशल्य विकास, तसेच आर्थिक स्वावलंबनासाठी कर्जहमी, प्रोत्साहनपर योजना केंद्र शासनाकडून राबविण्यात येत आहेत.

युवा शक्ती हे देशाचे भविष्य आहे. त्यामुळे नवतंत्रज्ञान व काळाची पावले ओळखून तयार केलेले उद्योग- संरेखित नवे अभ्यासक्रम देशात मोठे कुशल मनुष्यबळ निर्माण करतील व देशाची दृढपणे आर्थिक विकासाकडे वाटचाल होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला कारागीर, स्थानिक कलाकार व पारंपरिक व्यवसायातील तज्ज्ञ यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले. विश्वकर्मा लाभार्थी ग्यानबा तुकाराम बळकार यांच्या हस्ते वर्ग कक्षाचे उद्घाटन झाले. उपक्रमाद्वारे कौशल्य शिक्षणाचे विकेंद्रीकरण करण्यात येत असून, अभ्यासक्रमांची निवड स्थानिक मागणी व जनहिताच्या आवश्यकतेनुसार करण्यात आली आहे, अशी माहिती श्री. साळुंखे यांनी दिली.

# मोकाट कुत्र्यांचा उच्छाद निर्बीजीकरण ठप्प!

**अकोला :** महापालिका हद्दीत मोकाट कुत्र्यांची संख्या २० हजारांहून अधिक झाली असताना, या कुत्र्यांचा वाढता उपद्रव रोखण्यासाठी आवश्यक असलेला श्वान निर्बीजीकरण कार्यक्रम केवळ प्रशासकीय दिरंगाईमुळे ठप्प पडला आहे. कंत्राटदार निश्चित होऊनही, त्यांच्यासोबत करारनामा करण्यास विलंब झाल्याने अद्यापपर्यंत वर्क ऑर्डर काढली नाही.शहरातील होमगार्ड कार्यालय लगतच्या बंद पडलेल्या शाळेत मोकाट श्वानांचे निर्बीजीकरण करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. यापूर्वी हे काम अर्धवट राहिले होते, त्यामुळे महापालिकेने पुन्हा निविदा प्रसिद्ध केल्या. एका संस्थेची निविदा मंजूर झाली असली तरी, या संस्थेशी औपचारिक करारनामा करण्यास महापालिकेला बराच वेळ लागला. आता करारनामा पूर्ण झाला आहे, मात्र जोपर्यंत प्रशासनाकडून कार्यादेश मिळत नाही, तोपर्यंत संस्थेला प्रत्यक्ष कामाला सुरुवात करता येणार नाही. परिणामी, निर्बीजीकरण मोहीम अजूनही थांबलेल्या अवस्थेत आहे. संस्थेकडून दररोज ४० ते ५० कुत्र्यांचे निर्बीजीकरण करणे अपेक्षित आहे. शहरात २० हजारांहून अधिक कुत्र्यांची संख्या असताना, दररोजच्या या गतीने काम होणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र, प्रशासनाच्या दिरंगाईमुळे एकही ऑपरेशन झालेले नाही. मोकाट कुत्र्यांचा कळप रस्त्यांवर धुमाकूळ घालत असल्याने नागरिक, विशेषतः लहान मुले, कुत्र्यांच्या हल्ल्यांमुळे त्रस्त झाले आहेत. महापालिकेच्या या ढिसाळ कारभारावर संताप व्यक्त केला जात आहे.

# धनुर्विद्या भारतीय खेळास महत्त्व द्या : जिल्हा पोलीस अधीक्षक

**अकोला:** धनुर्विद्या हा भारताचा प्राचीन वारसा असलेला खेळ असून, या वैयक्तिक खेळातून खेळाडू आत्मविश्वासाने आपली प्रगती साधू शकतात. खेळाडूंनी या महत्त्वपूर्ण खेळाकडे वळावे, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी केले. ते अकोला जिल्हास्तरीय शालेय धनुर्विद्या स्पर्धेच्या उद्घाटनाप्रसंगी बोलत होते.यावेळी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्वतः धनुर्विद्येचा नेम अचूक साधून खेळाडूंना प्रोत्साहन दिले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती शिवछत्रपती पुरस्कार विजेते शत्रुघ्न बिरकड होते. प्रमुख अतिथी म्हणून दिग्दर्शक निलेश जळमकर, जिल्हा धनुर्विद्या संघटनेचे राजेंद्र जळमकर, नंदकिशोर बहादुरे, जिल्हा क्रीडाधिकारी सतीश भट, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे विलास कुमकर, दिनेश तायडे, दिनेश गायकवाड, बळीराम झांबरे, सावित्रीबाई फुले कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका फरेहा खान उपस्थित होते.

क्रीडा अधिकारी डॉ. अभिजीत फिरके, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अकोला जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अनिल मालगे आदी मान्यवर उपस्थित होते.या स्पर्धेत जिल्ह्यातून १४, १७, आणि १९ वयोगटातील खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. याप्रसंगी जिल्ह्यातील राष्ट्रीय व राज्यस्तरावर प्रावीण्य मिळवलेल्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाचे संचालन गजेंद्र काळे यांनी केले, तर प्रास्ताविक राजेंद्र जळमकर यांनी केले. आभार प्रदर्शन गावंडे यांनी केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी स्पर्धा निरीक्षक म्हणून प्रणव नंदकिशोर बहादूरे, आणि पंच म्हणून मोहन भातरकर, मनोज पायगन, हरीश कविटकर, अतुल पवरे, मंथन भातारकर, पूजा भडांगे, अनन्य पिंगाळे क्रीडा अधिकारी कार्यालयाचे अजिंक्य धेवडे निशांत वानखडे यांनी परिश्रम घेतले.

# शुक्रवारी रयत शेतकरी संघटनेच्या वतीने चक्काजाम आंदोलन

■अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :

अकोला अकोट राष्ट्रीय महामार्गावरील चोहोट्टा बाजार येथे दि १० ऑक्टोंबर रोजी, महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांची सरसकट कर्ज मुक्ती, करण्यात यावी,ओला दुष्काळ जाहीर करण्यात यावा व शेतकऱ्यांना आर्थिक मदत हेक्टरी ५० हजार रुपये देण्यात यावी, व शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात, रयत शेतकरी संघटनेच्या वतीने, दि. १० ऑक्टोंबर, रोजी राष्ट्रीय महामार्गावर सकाळी ११ वाजता. चोहोट्टा बाजार येथे, रयत शेतकरी संघटनेच्या वतीने चक्काजाम आंदोलन छेडण्यात येणार आहे.अशी माहिती माध्यमांशी बोलताना रयत शेतकरी संघटनेचे विदर्भ विभागीय युवा अध्यक्ष पूर्णाजी खोडके यांनी दिली आहे.. जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन खोडके यांनी केले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात 'टीडीएस' बाबत प्राप्तीकर विभागाच्या वतीने कार्यशाळा

## टीडीएस भरणा व विवरण वेळेत दाखल करावे: सुवर्णा शेवाळकर






■अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :

प्राप्तीकर विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे लेखा विभाग, उपकोषागार कार्यालयातील अधिकारी,कर्मचारी यांच्याकरिता टीडीएस विषयावर कार्यशाळा आज घेण्यात आली.

सर्वांनी वेळेवर टीडीएस भरण्याचे व त्याचे विवरण वेळेवर दाखल करण्याचे आवाहन यावेळी प्राप्तीकर अधिकारी सुवर्णा शेवाळकर यांनी केले.यावेळी प्राप्तीकर विभागाचे विकास कुमार (प्राप्तीकर अधिकारी),संजय वानखेडे ( प्राप्ती कर निरीक्षक ),प्रदीप मीना (कर सहायक)रामकृष्ण तिवळे (कर सहायक) शिवम सिंग (एम.टी. एस) आदी उपस्थित होते.कार्यशाळेमध्ये प्राप्तीकर कायदा १९४अ,१८४,१९४ क,१९४ I,१९४ग पॅन आधारित टीडीएस,आधार लिंकिंग याबाबत माहिती देण्यात आली. टीडीएस विषयाची माहिती पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे समजावून सांगण्यात आली.कार्यशाळेला जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

## थोडक्यात

### शेतकरी पुत्राची आत्महत्या

**बाळापूर :** बाळापूर तालुक्यातील मोरगाव सादीजन येथील अजय किसन वाघ (२१) या शेतकरी पुत्राने रविवारीरात्री स्वतःचे राहते घरीच गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. अजय किसन वाघ यांचे वडिलांचे नावाने सामायीक कुटूंबात शेती असून कर्जाचा डोंगर वाढत असल्यामुळे चिंतेत असलेल्या अजयने अखेर आपली जिवनयात्रा संपविली आहे.सोमवारी शवविच्छेदनानंतर किसन अजय वाघ यांचेवर मोरगाव सादीजन येथे शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

### शेतातील स्प्रिंकलरचे साहित्य जळून खाक

**तेल्हारा :** तालुक्यातील कार्ला येथील शेत शिवारात विद्युत रोहित्राच्या शॉर्टसर्किटमुळे शेतात असलेले तुषार सिंचनाचे ६० पाईप व १६ नोझल जळून खाक झाल्याची घटना ७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास घडली. याबाबतची तक्रारशेतकरी कुलदीप प्रदीप बाजारे यांनी महावितरण कार्यालय तसेच तेल्हारा तहसीलदार यांच्याकडे केली असून जळालेल्या साहित्याची, नुकसानीचा तात्काळ पंचनामा व अहवाल तयार करून भविष्यात अशा प्रकारच्या दुर्घटनाटाळण्यासाठी ट्रान्सफॉर्मरची तात्काळ दुरुस्ती करावी, अशी मागणी तक्रार अर्जातून करण्यात आली आहे. या संदर्भात दिलेल्या तक्रारीनुसार, महावितरण विभागाच्या भोंगळ कारभारामुळे रोहित्रावर शॉर्टसर्किट झाले. त्यामुळे शेतात आग लागून स्प्रिंकलर सिस्टिमचे ६० पाईप व १६ नोझल पूर्णतः जळाल्याने संबंधित शेतकऱ्याचे सुमारे ६० हजार रुपयांचे नुकसान झाले असून, सदर घटना महावितरण कंपनीच्या उपकरणांच्या देखभालीतील त्रुटीमुळे झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

# पाणी देयकासंबंधी आणि पाणीपट्टी कराचा भरणा करण्यासाठी

## अग्रसेन भवन येथे विशेष शिबीराचे आयोजन

■अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील नळ जाडणी धारकांना आपले पाणी पट्टी कर भरणे तेसच बिला संदर्भातील काही तक्रार असल्यास (ज्यामध्ये नळाच्या बिलाची दुरूस्ती, बिल जास्त आल्यास त्यावरील तक्रारी, नळ जोडणी असतांनाही बिल न येणे आदि) त्यांचे निराकरण करणे अधिक सोईचे व्हावे याकरिता मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये जलप्रदाय विभागाद्वारे विशेष शिबीरांचे आयोजन करण्यात येत आहे.

यामध्ये दि. ०९ ऑक्टोंबर २०२५ रोजी सकाळी १० ते २ वाजेपर्यंत पुर्व झोन अंतर्गत अग्रसेप भवन, न्यु राधकिसन प्लॉट, अकोला प्रभाग क्रं. १२ येथे एक दिवसीय शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी त्या भागातील नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन आपला थकित व चालू वर्षातील पाणी पट्टी देयके अदा करून मनपा प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन मनपा जलप्रदाय विभागाचे कार्यकारी अभियंता केले आहे.टिप – शिबिरात येतावेळी पाणीपट्टी देयकाची प्रत, मिटर रिडींगचा फोटो आणि पुर्वी देयक'अदायगी संदर्भातील पावती सोबत आणावी.

# कापूस संशोधन विभागातर्फे जागतिक कापूस दिनाचे आयोजन

■अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :

डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील कापूस संशोधन विभागाच्या वतीने ७ ऑक्टोबर ला जागतिक कापूस दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन या वर्षी अलियाबाद ( ता.अकोला ) येथील श्री. अजय पागृत यांच्या शेतात करण्यात आले होते. दरवर्षी ७ ऑक्टोबर रोजी संपूर्ण जगभर कापूस पिकाचे अर्थ व्यवस्थेतील महत्व लक्षात घेता या दिवसाचे आयोजन करण्यात येते. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.शरद गडाख तसेच संशोधन संचालक डॉ.शामसुंदर माने यांच्या मार्गदर्शनात यावेळी कापूस संशोधन विभागातील शास्त्रज्ञांनी गावातील शेतकऱ्यांच्या शेतांना भेट देऊन कापूस पिकाची सद्यस्थिती, कीड व रोग व्यवस्थापन तसेच पिक नियोजनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. आर. बी. घोराडे, वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ यांनी विद्यापीठ विकसित तंत्रज्ञानाचा अवलंब करून शास्वत उत्पादनासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. या विभागाचे कृषिविद्यावेत्ता डॉ. संजय काकडे यांनी सध्य परिस्थितीत पावसाच्या उघडीप नंतर कापूस पिकाची काळजी घेण्यासंबंधी तांत्रिक मार्गदर्शन केले तसेच कोरडवाहू परिस्थितीत जास्त उत्पादनासाठी अतिघनता लागवड व कापूस पिक संरचना व्यवस्थापन तंत्रज्ञान या विषयावर शेतकऱ्यांना माहिती दिली.श्री. पी. पी. पाटील, कापूस किटकशास्त्रज्ञ यांनी गुलाबी बोंड अळीचे नियंत्रण व व्यवस्थापन याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.डॉ. नवीनचंद्र कायंदे, कापूस पैदासकार यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्यांची माहिती घेतली व विद्यापीठाचे नवीन विकसित कापूस वाण २०२२-१ आणि २०२२-२ यांची वैशिष्ट्ये सांगितली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ओम प्रकाश राखोडे यांनी केले, तर आभारप्रदर्शन श्रीकांत सरप यांनी केले.




# 'आनंदाचा शिधा' योजना सुरू ठेवण्याची

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची मागणी

■अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट), अकोला तर्फे आज सणासुदीच्या काळात ङ्गआनंदाचा शिधाङ्ग योजना सुरू ठेवण्याबाबतचे निवेदन उपजिल्हाधिकारी श्री. विजय पाटील यांना सादर करण्यात आले. हे निवेदन मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांना पाठविण्यासाठी देण्यात आले.हे निवेदन महानगराध्यक्ष रफीक सिद्दीकी, प्रदेश संघटक सचिव जावेद जकरिया, कार्याध्यक्ष युसूफ अली, कार्याध्यक्ष देवाभाऊ ताले आणि पश्चिम विधानसभा अध्यक्ष मेहमूद खान पठाण यांच्या स्वाक्षरीने सादर करण्यात आले.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की आनंदाचा शिधाङ्ग योजना ही महाराष्ट्रातील गरीब व गरजू नागरिकांसाठी सणासुदीच्या काळात अत्यंत उपयुक्त ठरली आहे. या योजनेअंतर्गत फक्त १०० रुपयांमध्ये सूजी, साखर, डाळ, तेल यांसारख्या अत्यावश्यक वस्तू मिळाल्याने हजारो कुटुंबांना सण आनंदात साजरा करता आला.अलीकडे ही योजना बंद करण्याच्या चर्चेमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये निराशा निर्माण झाली असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार) तर्फे ही योजना तात्काळ सुरू ठेवण्याची व आवश्यक आर्थिक तरतूद करण्याची मागणी करण्यात आली आहे. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी नमूद केले आहे की, सरकारचे कार्य लोकहितकारी योजना बंद करणे नव्हे, तर त्या अधिक प्रभावीपणे राबवून त्या गरजूंपर्यंत पोहोचवणे हे असावे. गरीब व वंचित घटकांच्या कल्याणासाठी आनंदाचा शिधाङ्ग योजना अत्यंत आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.या प्रसंगी महबूब मंतुवाले, चंदू भाई चांदखां, ॲड. संदीप तायडे, मिलिंद गवई, नरेंद्र देशमुख, शेख रमजान, जॉन्शन वारघत, सरला वारघत, अमन घरडे, सोहेल खतीब, रेहान सिद्दीकी, शेख सुबानव गौरवी (माजी सभापती, माजी नगरसेवक), रासू पलनपप्पु भाई, रजिक इंजिनियर भाई चांदख तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपजिल्हाधिकारी श्री. विजय पाटील यांनी हे निवेदन मुख्यमंत्री कार्यालयाकडे पाठविण्याचे आश्वासन दिले.

# पीएनजी ज्वेलर्स तर्फे दिवाळीनिमित्त विशेष फेस्टिव्ह ऑफर्स

## सोन्याच्या घडणावळीकर ५० टक्के सूट

**अकोला :** भारतातील विश्वासार्ह संघटित कौटुंबिक ज्वेलर, पीएनजी ज्वेलर्सला आपल्या भव्य दिवाळी मोहिमेची घोषणा करताना आनंद होत आहे. ही मोहिम २२ सप्टेंबरपासून सुरू होईल आणि २६ ऑक्टोबर २०२५ पर्यंत चालेल. या मोहिमेमुळे ग्राहकांना अत्यंत आकर्षक किमतीत उत्कृष्ट दागिने घरी आणण्याची एक अनोखी संधी मिळणार आहे, ज्यामुळे हा सणासुदीचा काळ अधिक अविस्मरणीय बनेल यात शंका नाही.या दिवाळी मोहिमेअंतर्गत, ग्राहक सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर ५० टक्के पर्यंत सूट आणि हिऱ्यांच्या दागिन्यांच्या घडणावळीवर १०० टक्के पर्यंत सूट तसेच जुने सोने बदलताना ० टक्के कपात या खास ऑफर्सचा लाभ घेऊ शकतात. या ऑफर्स सर्व पीएनजी ज्वेलर्सच्या स्टोअर्समध्ये आणि ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असतील, ज्यामुळे अतुलनीय कारागिरीचे कालातीत दागिने घेऊन सणासुदीचा आनंद साजरा करू इच्छिणाऱ्या दागिन्यांच्या शौकिनांसाठी सुलभता आणि सोय सुनिश्चित होईल.या मोहिम बद्दल बोलताना, पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, 'दिवाळी हा प्रकाश, समृद्धी आणि एकत्र येण्याचा सण आहे. पिढ्यानपिढ्या पीएनजी ज्वेलर्सवर विश्वास ठेवणाऱ्या आमच्या ग्राहकांसोबत हा सण साजरा करण्याची ही आमच्यासाठी नेहमीच एक खास संधी असते. आमचे दागिने अधिक सुलभ बनवून, उत्तम मूल्य प्रदान करत, सणाचा आनंद पसरवण्याचा हा आमचा मार्ग आहे. परंपरा, सौंदर्य आणि परवडणाऱ्या किमतींचा परिपूर्ण संगम अनुभवण्यासाठी आम्ही आमच्या ग्राहकांचे स्वागत करण्यास उत्सुक आहोत.'भारतात उत्तम दागिने खरेदी करण्यासाठी दिवाळी हा सर्वात शुभ काळ मानला जातो. या मोहिमेद्वारे, पीएनजी ज्वेलर्स आपला विश्वास, शुद्धता आणि कारागिरी या खास वैशिष्ट्यांद्वारे ग्राहकांशी असलेले आपले नाते अधिक दृढ करत आहे. या सणासुदीच्या काळात, खरेदीदारांना सोने आणि हिऱ्यांच्या दागिन्यांची विस्तृत श्रेणी एक्सप्लोर करण्याची संधी मिळेल, जे पारंपरिक कलात्मकता आणि समकालीन शैली या दोन्हींचे प्रतिबिंब दर्शविण्यासाठी खास तयार केले गेले आहेत.

# देशाच्या संदर्भात महापुरुषांचे विचार भिन्न–प्रा वाकुडकर

## बाबूजी देशमुख व्याख्यानमालेत आज पुणे येथील श्रुती तांबे यांचे व्याख्यान

**अकोला :** सकल मानव जात व राष्ट्राच्या कल्याणासाठी संत व महापुरुषांचे विचार हे भिन्नभिन्न होते. त्यांनी देशाच्या संदर्भात वेगवेगळे स्वप्न बघितले होते.तथापि देशातील सामान्य माणसाच्या विकासाच्या संदर्भातील त्यांचे विचार वेगवेगळे असले तरी उद्देश हे समान होते. म्हणून संत व महापुरुष हे वेगवेगळ्या मार्गाने गेल्यावरही ते पराकोटीला पोहोचले असून त्यांच्या देशप्रेम व निरपेक्ष भावनेने समाज सुखी झाला असल्याचे मत नागपूर येथील व्याख्याते प्रा ज्ञानेश वाकुडकर यांनी व्यक्त केले. बाबूजी देशमुख वाचनालयाच्या वतीने स्थानीय प्रमिलाताई ओक सभागृहात सुरू असलेल्या ९ दिवसीय नवरात्र व्याख्यानमालेचे प्रा वाकुडकर यांनी पंचम पुष्प गुंफले.कधी कृष्ण आहे, कधी बुद्ध आहे या विषयावर त्यांनी आपल्या व्याख्यानात ऊहापोह केला.ते पुढे म्हणाले,या मातीचे संचित आहे की या मातीत मोठे संत,तत्त्ववेत्ते व महामानव निर्माण झाले आहेत.मात्र आपली समस्या अशी आहे की आपण या संदर्भात कधी चिंतन करीत नाही.त्यामुळे सामाजिक, वैयक्तिक प्रश्न निर्माण होऊन स्वतःचे व समाजाचे बरे वाईट होते. या भौतिक जगतातील व्याख्या पूर्ण करण्याचा प्रयत्न ही निरंतर चालणारी प्रक्रिया असल्याचेही त्यांनी सांगितले.ते पुढे म्हणाले, या पद्धतीमुळे समाज घडतो. नव्या गोष्टी निर्माण होतात. काही केल्यामुळेच आपण जिवंत आहोत अशी भावना समाजात निर्माण होते. म्हणून समाज व देशासाठी काहीतरी करीत राहणे हे खऱ्या जिवंत पणाचे लक्षण असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# पाणंदरस्ते अतिक्रमण मुक्त करण्यासाठी मोहीम स्तरावर काम करा : जिल्हाधिकारी वर्षा मीना

**▪अकोला : दि ८ (प्रतिनिधी) :**
नागरिकांचे प्रलंबित प्रश्न सुटावेत व त्यांना उत्तम सेवा मिळावी यासाठी सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम केवळ या कालावधीपुरता मर्यादित न राहता सातत्यपूर्ण कार्य करावे. पानंदरस्ते अतिक्रमण मुक्त करण्यासाठी स्तरावर काम करावे असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी अकोट येथे दिले.

जिल्हाधिकाऱ्यांनी तहसील कार्यालय अकोट व उपविभागीय अधिकारी कार्यालय अकोट येथे भेट देऊन कार्यालयाची पाहणी केली. कार्यालयामध्ये नागरिकांच्या माहितीसाठी लावण्यात आलेले विविध क्यू आर तसेच इतर माहिती फलक याबाबत पाहणी करून माहिती जाणून घेतली. त्याचप्रमाणे सेवा पंधरवड्यामध्ये केलेल्या कामकाजाचा आढावा घेतला. उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व तालुकास्तरीय व उपविभाग स्तरीय अधिकारी यांची आढावा सभा घेऊन त्यांच्या विभागामार्फत केल्या जाणाऱ्या विविध कामकाजाची माहिती घेतली, तसेच ग्रामीण रुग्णालय अकोट येथे भेट देऊन रुग्णालयामार्फत नागरिकांना



पुरविल्या जाणाऱ्या विविध वैद्यकीय सेवांची पाहणी केली.जिल्हाधिकाऱ्यांनी मुख्याधिकारी अकोट यांचे कार्यालयात भेट देऊन नगरपरिषद कामकाजाबाबत आढावा घेतला. नगरपरिषद मार्फत नागरिकांना पुरविल्या जाणाऱ्या अत्यावश्यक सेवा योग्य दर्जाचे असाव्यात तसेच शहराचे सौंदर्यीकरण करण्याबाबत निर्देश दिले.त्यांनी मौजे जीतापूर येथील स्वयंचलित पर्जन्यमापक यंत्र चे ठिकाणी भेट देऊन पाहणी केली व परिसरातील शेतकऱ्यांच्या याबाबत असलेल्या तक्रारी जाणून त्या सोडवण्याचे निर्देश दिले. जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी मौजे बोर्डी



येथे जनसंवाद कार्यक्रमांमध्ये उपस्थित राहून नागरिकांच्या तक्रारी व समस्या जाणून घेतल्या व सदर समस्या सोडविण्यासाठी संबंधित सर्व विभागांचे अधिकारी यांना निर्देश दिले.

## रस्त्यांवर पुन्हा मास विक्री

**अकोला :** शहरातील विविध मार्गांवर पुन्हा एकदा रस्त्यावरच मास विक्री सुरू झाल्याचे चित्र दिसत आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात महानगरपालिका व पोलिसांनी उघड्यावरची मास विक्री बंद केली होती. परंतु आता पुन्हा ही विक्री सुरू झाल्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

या अवैध मास विक्रीमुळे शहरात दुर्गंधी पसरली असून वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. तसेच मोकाट कुत्र्यांचा त्रासही वाढला आहे. शरद बहुतेक चौकांसह दगडी पूल, ओटकर चौक, नीमतीनगर, रामदासपेठ आणि जुने शहर परिसरात मोठ्या प्रमाणावर रस्त्याच्या कडेला मास विक्रीची दुकाने थाटली जात आहेत. नियमांनुसार, अशा प्रकारची मास विक्री करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाचा वैध परवाना घेणे बंधनकारक आहे.

# शहरात कचऱ्याचे ढीग,दुर्गंधी व डासांच्या उपद्रवाने नागरिक हैराण





**अकोला :** शहरातील विविध भागांत महापालिकेच्या हलगर्जीपणामुळे साचलेला कचरा नागरिकांचे आरोग्य धोक्यात आणत आहे. जैन रोड, नवीन शहरातील रस्ते, तसेच आर. पी.टी.एस. रोडवरील मोर्ना नदीकाठचा नाला या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर कचरा व घाण साचून राहिली आहे.

परिणामी दुर्गंधी पसरली असून डास, माशा आणि रोगजन्य जंतूंचा प्रचंड उपद्रव जाणवत आहे. पावसा मुळे नाले तुंबल्याने साचलेल्या पाण्यातून डासांची उत्पत्ती वाढली आहे. रात्रीच्या वेळेस प्रकाश टाकल्यावर डासांच्या थवा दिसून येतात. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, महापालिका रोज कचरा गोळा करण्याचा दावा करते, मात्र प्रत्यक्षात सफाईचं काम अपूर्ण आहे. निवडक भागातच साफसफाई केली जाते, असा आरोप होत आहे.

आरोग्य विभागानेही मान्य केले आहे की, डेंग्यू, मलेरिया, टायफॉईड सारख्या संसर्गजन्य रोगांचा धोका वाढला आहे. मात्र, महापालिकेकडून डास प्रतिबंधक फवारणीही नियमित केली जात नसल्याचं नागरिकांचे म्हणणे आहे.

स्वच्छ अकोला'चा नारा केवळ कागदापुरता मर्यादित राहिला असून, प्रत्यक्षात शहरात गलिच्छतेचे चित्र पाहायला मिळत आहे. महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष कायम राहिल्यास गंभीर आरोग्यसंकट ओढवू शकते, अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत.

# आकाशवाणी कृषी कार्यक्रम सल्लागार समिती बैठक संपन्न

**▪अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :**
आकाशवाणी केंद्र कृषि विषयक कार्यक्रम किसानवाणी सल्लागार समितीची तिमाही बैठक स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था अकोला येथे सहयोगी अधिष्ठाता डॉ.चैतन्य पावसे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.यावेळी आकाशवाणीवरून प्रसारीत होणाऱ्या कृषि विषयक कार्यक्रमांवर चर्चा झाली.सल्लागार समिती सदस्यांचे स्वागत व प्रास्ताविक प्रसारण अधिकारी सूरज गोळे यांनी केले.बैठकीला विभागीय वनअधिकारी



सामाजिक वनीकरण महेश खोरे,कृषी उपसंचालक हरीश देशमुख,आत्मा उपसंचालक डॉ.प्रेमसिंग मारग,कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ.उमेश ठाकरे,कृषी विद्यापीठाच्या डॉ.अरुणा काटोले, मत्स्य विकास अधिकारी अमित जाधव,पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ. महेश इंगवले,प्रयोगशील शेतकरी विठ्ठलराव माळी आदी उपस्थित होते. किसानवाणी कार्यक्रमांतर्गत आकाशवाणी वरून प्रसारीत होणारे व पुढील तिमाहीत प्रसारित केल्या जाणारे कार्यक्रम मत्स्यशेती,नैसर्गिक शेती,पशुविज्ञान, सामाजिक वनीकरण विभागाच्या विविध योजना, कृषी विद्यापीठ तंत्रज्ञान,बदलत्या हवामानामुळे पशु व पिकांवर होणारे बदल यासह विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. आकाशवाणीचे कार्यक्रम अधिक प्रभावीपणे सादर करण्यासाठी सुचना दिल्यात.सुत्रसंचालन सचिन म्हैसने यांनी केले.दूरदर्शन प्रतिनिधी विशाल बोरे ,किशोर कुकडे,प्रकाश नावकार,किशोर राउत,विशाल धांडे यांचे सहकार्य लाभले.

## स्मशानभूमितील अतिक्रमण काढण्यासाठी तहसीलदारांना निवेदन

**वाडेगाव :** येथील लहानी हद्द स्मशान भूमी मध्ये काही लोकांनी अतिक्रमण केल्यामुळे मृत व्यक्तीला दहन करणे साठी जागा आहे, पण काही इतर हिंदू धार्मियात मृत व्यक्तीला दफन करतात. अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण केल्यामुळे या ठिकाणी दफन करण्यासाठी जागा कमी पडत आहे. त्यामुळे लोकांना याचा त्रास होत असून येथील अतिक्रमण काढणेसाठी तहसीलदार बाळापूर यांना निवेदन देण्यात आले आहे. या ठिकाणी राजेंद्र मानकर सरपंच असताना पाण्यासाठी स्मशान भूमीच्या जागेत एक बोरवेल खोदली होती त्याला पाणी पण लागलेले आहे.

# गायत्री परिवाराच्या ज्योती कलश यात्रेचे अकोट तालुक्यात आगमन

**▪अकोट,दि ८ (प्रतिनिधी) :**स्थानिक प्रतिनिधी अखिल विश्व गायत्री परिवार ,शांतिकुंज हरिद्वार यांच्या तत्वावधानांमध्ये शांतीकुंज हरिद्वार येथून ज्योती कलश यात्रेचे दिनांक १२ ऑक्टोंबर रविवार रोजी अकोट तालुक्यामध्ये आगमन होत आहे ज्योती कलश यात्रा पाच दिवस अकोट तालुक्यातील विविध गावांमध्ये जाणार आहे.

त्या गावांमध्ये पाच कुंडी गायत्री यज्ञ, दीप यज्ञ, प्रवचन यासारखे कार्यक्रम संपन्न करून पाच दिवसानंतर अंजनगाव तालुक्यामध्ये प्रवेश करणार आहे युग ऋषी वेदमूर्ती तपोनिष्ठ पंडित श्रीराम शर्मा आचार्यजी यांनी १९२६ ह्या वर्षी आपल्या २४ वर्षाच्या २४ गायत्री महापुराष्चरणाला सुरुवात केली होती व त्याच दिवशी अखंड दीपक प्रज्वलित केला होता त्याला १०० वर्ष पूर्ण होताहेत. त्यावरूनच ही ज्योती पेटविण्यात आली आहे तसेच वंदनीय माताजी भगवती देवी शर्मा यांचे जन्म शताब्दी वर्ष २०२६ ला आहे कलशामध्ये २४ तीर्थांचे



जल व रज ही टाकलेले आहे अशी ही ज्योती कलश यात्रा अकोट तालुक्यात येत आहे हे आपणा सर्वांसाठी सौभाग्याची गोष्ट आहे.

ज्योती कलश यात्रेचा उद्देश हा आहे की व्यक्ती व्यक्ती मध्ये देवत्वाचा उदय व्हावा सनातन संस्कृतीचे बिजारोपण व्हावे राष्ट्रीय एकता निर्माण व्हावी हा भव्य दिव्य उद्देश ठेवूनच भारताच्या प्रत्येक राज्यात ही कलश यात्रा पोहोचत आहे अकोट तालुक्यात त्यांचा कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे दिनांक १२ ऑक्टोंबर रविवार:- अडगाव खुर्द, शिरसोली, मुंडगाव,अकोट.दिनांक १३ ऑक्टोंबर सोमवार:- उमरा, लाडेगाव, मकरमपूर वडाळी सटवाई ,वरूड जवळका दिनांक १४ ऑक्टोंबर मंगळवार:- उमरी ,वडनेर गंगाई दिनांक १५ ऑक्टोंबर बुधवार:- मंचनपूर, बोचरा दिनांक १६ ऑक्टोंबर गुरुवार:- अकोलखेड, अकोली जहागीर दिनांक १७ ऑक्टोंबर शुक्रवार :-अंजनगाव तालुक्यात प्रवेश करतील सर्वांना नम्र विनंती आहे.

की ज्या ज्या गावांमध्ये ही ज्योती कलश यात्रा जाणार आहे तेथील रहिवाशी व परिसरातील लोकांनी स्वागत व दर्शनासाठी जरूर जावे व आयोजित केलेल्या पाच कुंडी गायत्री यज्ञ व दीप यज्ञांमध्ये सहपरिवार सम्मिलित व्हावे हा एक सौभाग्याचा योग आहे त्यामध्ये सहभागी व्हावे ही विनंती.

## सीईओ अनिता मेश्राम यांच्या हस्ते टॅलेंन्ट स्टडी पॉईन्ट अभ्यासिकेचे उद्घाटन

**अकोला:** समता कॉलनी रिंगरोड कौलखेड येथील टॅलेन्ट स्टडी पॉईन्ट अभ्यासिकेचे उद्घाटन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा. मुकुंद भारसाकळे, रमेश तायडे, अशोक इंगळे, प्रभाकर घुगे सदस्य राज्य ग्रंथालय परिषद, डोंगरे, उर्मिलाताई भगत, राजेंद्र घनबहादुर, भुपेश मुन, शिलाताई मुन, मुरलीधर टेकुलवार, प्रमोद काळे व अभ्यासिकेचे संचालक किर्तीश्रीराज सिरसाट, गजानन ढाले मुख्याधापक उपस्थित होते. अनिता मेश्राम यांनी अभ्यासिकेचे महत्व व स्पर्धात्मक परिस्थितीबद्दल मार्गदर्शन केले. प्रा. मुकुंद भारसाकळे, अशोक इंगळे, रमेश तायडे, उपस्थित होते.

## प्रभात'चे दहा विद्यार्थी शुटींग बॉल स्पर्धेत विभागस्तरावर






**▪अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :**
प्रभात किड्स स्कूलच्या दहा खेळाडूंनी जिल्हास्तरीय शुटींग बॉल क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट यश प्राप्त केल्याने त्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा संकुल व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय शुटींग बॉल स्पर्धेचे आयोजन वसंत देसाई स्टेडीयम, अकोला येथे दि. ३० सप्टेंबर दरम्यान २०२५ करण्यात आले होते.या स्पर्धेत १७ वर्षाआतील मुलांमध्ये यश अमृतकर, अंश यादव, हर्षल हागे, श्रीयश चतरकर, चैतन्य अढाव, अधिराज ढोरे, आयुष मानकर, प्रिंस चौरीपगार, तेजस ठमके व कल्पेश बैस यांनी उत्कृष्ट यश संपादीत केल्याने या सर्व विद्यार्थ्यांची विभागस्तरावर निवड झाली आहे. या विजयी खेळाडूंना प्रभातचे क्रीडा प्रशिक्षक अनिल कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.प्रभातच्या प्राचार्य वृषाली वाघमारे, उपप्राचार्य अर्चना बेलसरे, समन्वयक मो. आसिफ, क्रीडा विभाग प्रमुख स्वप्निल मांदाळे, उप विभागप्रमुख आशिष बेलोकार यांच्यासह शिक्षकवृंद तथा कर्मचार्यांनी विजयी खेळाडूंचे कौतुक केले आहे.

## श्री संत गजानन महाराज चरित्र ग्रंथ सामुहिक पारायण सोहळा

### श्री ज्ञानेश्वरी तथा श्री नरसिंह लीलामृत ग्रंथासह त्रिवेणी संगम

**▪अकोट,दि ८ (प्रतिनिधी) :**
स्थानिक श्री संत नरसिंह महाराज समाधी मंदिर येथे श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह भक्तीभावपूर्ण वातावरणात सुरू आहे. या सप्ताहमध्ये दरवर्षी श्री ज्ञानेश्वरी तसेच श्री नरसिंह लीलामृत ग्रंथाचे पारायण होत असते. यावर्षी सप्ताहाचे ३६ वे वर्ष असल्याने त्रितपपूर्ती सोहळ्याचे औचित्य साधून श्री संत वासुदेव महाराज उपाख्य श्री ज्ञानेश्वरदास विरचित श्री संत गजानन महाराज चरित्र या ग्रंथाचे सामुहिक पारायण गुरुवार दिनांक ९ आक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता होणार आहे. पारायण पिठाचे नेतृत्व श्री.ह.भ.प. अंबादास महाराज मानकर यांचेकडे राहील.

ज्या भक्तांकडे हा ग्रंथ नसेल त्यांच्याकरिता 'श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, श्री क्षेत्र श्रद्धासागर, आकोट' यांनी सर्व पारायणकर्त्या भाविक भक्तांकरिता चरित्र ग्रंथ उपलब्ध करून दिला आहे. सकाळी आठ वाजता पारायणाला सुरुवात होऊन ११ वाजता प्रवचन, तदनंतर ग्रंथ पूजन होइल .सर्व भाविकांची महाप्रसादाची व्यवस्था तसेच पारायणा दरम्यान अल्प विश्रांतीम



ध्ये श्री उद्धवराव ठाकरे यांच्याकडून भाविकांची अल्पोपहार व चहाची व्यवस्था करण्यात आली आहे. संपूर्ण ज्ञानेश्वरी पारायणाकरिता सात दिवस ज्या भक्तांना पारायण करणे शक्य होत नाही, त्यांच्या करिता ही सुवर्णसंधी आली आहे. सद्गुरु श्री संत नरसिंह महाराज यांच्या दरबारामध्ये आणि विशेषतः या स्थळाला सद्गुरु श्री संत गजानन महाराज यांचे चरण स्पर्श लाभले, त्या मनकर्णा विहिरीच्या समिप असलेल्या या सप्ताहामध्ये हा सामुहिक पारायण सोहळा संपन्न होत आहे. श्री संत नरसिंह महाराज संस्थानचे अध्यक्ष श्री सतीशभाऊ आसरकर यांनी सर्व पारायण कर्त्या भक्तांकरिता सुसज्ज असे भव्य सभागृह उपलब्ध करून भाविकांसाठी सर्व व्यवस्था करून दिली आहे.

# कुंभारपुरा शारदा मातेस भक्तिपूर्ण साज



**▪मुर्तिजापुर,दि ८ (प्रतिनिधी) :**
शहरातील जुनी वस्ती कुंभारपुरा येथे शारदा माता देवीची प्रतिष्ठापना अत्यंत भक्तिपूर्ण आणि उत्साहवर्धक वातावरणात पार पडली. शिवशक्ती शारदा महिला मंडळाने आणि लहान मुलांनी ऑपरेशन सिंधूचे सजीव आणि प्रभावी कार्यक्रम सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. 'भारत माता की जय'च्या घोषांनी परिसर भारून टाकला, तर गुणगान आणि मंत्रोच्चाराने वातावरण भक्तीने भारले. नूतन ताई पिंपळे, मोनाली ताई गावंडे, कविता–रीना गुल्हाने, रेखा काकडे, ललिता–मालती गुल्हाने, सविता मेहेरे, संगीता काकडे, किरण कथले, शैला बेलोंडे, शिल्पा कुटाफळे, मंजू, अर्चना धामोरे, सीमा कथले, पदमा खंडारे, आराधना कथले व इतर मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांच्या चेहऱ्यावर आनंद आणि भक्तीची झळक स्पष्ट दिसत होती.

**CHANGE IN NAME**
I Have Change My Name in My Passport :- **(L2577283)**
--------From----------
**NAFEESA AKHTAR QURESHI**
---------TO------------
**NAFEESA AKHATAR ABDUL WAHAB**
My Residential Address is :- At. Post. Chinchamba Bhar Tq. Risod Dist. Washim 444506.

**CHANGE IN NAME**
I Have Change My Name
--------From----------
**YASH RATHI**
---------TO------------
**YASH DINESH RATHI**
My Residential Address is :- 203 Kalpana Arch Appartment Adarsh Colony Akola 444004.

**CHANGE IN NAME**
I Have Change My Name in My Passport :- **(L2577077)** & Under Wife Passport also **(L2577283)**
--------From----------
**ABDUL WAHAB QURESHI**
---------TO------------
**ABDUL WAHAB SHAIKH DAWAL**
My Residential Address is :- At. Post. Chinchamba Bhar Tq. Risod Dist. Washim 444506.

**CHANGE IN NAME**
I Have Change My Name in My Husband Passport **:- (L2577077)**
--------From----------
**NAFEESA AKHTAR ABDUL WAHAB QURESHI**
---------TO------------
**NAFEESA AKHATAR ABDUL WAHAB**
My Residential Address is :- At. Post. Chinchamba Bhar Tq. Risod Dist. Washim 444506.

# पातूर शहरात श्री जगदंबा देवीची नगर प्रदक्षिणा पातुर नगरी दुमदुमली

**▪पातुर,दि ८ (प्रतिनिधी) :**
विजयादशमीनिमित्त श्री जगदंबा देवीची पालखी 'बोल सदानंदीचा उदो उदो–तुको बादशाह की जय', 'हर बोला महादेव'च्या जयघोषात सिमोल्लंघनासाठी दसऱ्याच्या दिवशी विधिवत पूजन करून सायंकाळी पाच वाजता दरम्यान मंदिरातून निघाली. यावेळी नगर प्रदक्षिणेत सुवर्ण नदीच्या पुलावरून शिवाजीनगर भागातून मार्गक्रमण करीत रेणुका देवीच्या पायथ्याशी दसरा मैदानावर काही वेळ विश्रांती घेऊन ,हजारो भाविकांच्या उपस्थितीत फटाक्यांची आतषबाजी व महाआरती केली जाते. श्री जगदंबा देवीची महाआरती देवकर कुटुंबीयांकडून व हजारों भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या हर्ष उल्हासात भाविक 'पोतबंदे खेळत' करण्यात येते.
भाविक भक्तगण देवीला पारंपारिक रित्या प्रातिनिधिक स्वरूपात सोने,चांदी अर्पण करून



भाविक देवीचे दर्शन घेऊन तृप्त होतात. 'पातुर चे विशेष आकर्षण असलेला 'रावण दहन महोत्सवाचे 'श्री सिदाजी महाराज व्यायाम शाळा व दसरा उत्सव समिती च्या वतीने आयोजन करण्यात येते. यावेळी विविध सामाजिक क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थी, खेळाडू ,यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येतो. तसेच किड्सच्या विद्यार्थ्यांनी ऑपरेशन सिंदूर ही नाटिका सुंदर रित्या सादर केली. रावण दहन कार्यक्रमासाठी व्यायाम शाळेचे पदाधिकारी व कार्यकर्ते अथक परिश्रम घेतात. दसऱ्याच्या दिवशी भाविकांनी श्री रेणुका देवीच्या दर्शनासाठी टेकडीवर (गडावर) व दसरा मैदानावर हजारोच्या संख्येने आपल्या डोळ्याचे पारणे फेडण्यासाठी देवीचा उत्सव , रावण दहन आदी कार्यक्रम पाहण्यासाठी व देवीच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी संपूर्ण टेकडी भक्तांनी फुलून गेल्याचे आनंददायी चित्र यावेळी दृष्टीस पडते.विशेष आकर्षण असलेल्या रावनाचे दहन मान्यवरांच्या हस्ते करण्यात येते.व देवीची पालखी पुढील प्रवासासाठी बाळापुर मार्गावरून पुलावरून सुवर्णानदी ओलांडत वेशीतून गावात प्रवेश करते. श्री सिदाजी महाराज वेटाळ, भोईपुरा या ठिकाणी वर्षातून केवळ एकच वेळा शहरातील श्री खडकेश्वर वेटाळातील मोठी श्री जगदंबा देवी व भगत वेटाळ , गुरुवार पेठ येथील अशा तिन्ही देवीची भेट होते.
. ही भेट पाहण्यासाठी व देवीच्या दर्शनासाठी भाविक गर्दी करतात. व देवीच्या समोर पोतबंदे खेळत, टाळ मृदंग , झांज, डफफडे वाजवून आपली सेवा अर्पण करतात. देवीचा जयघोष करीत पालखी सोहळा पाटील मंडळी ,गुजरी लाईन, मार्गे सकाळी आपापल्या ठिकाणी मार्गस्थ होतात. हा उत्सव पाहण्यासाठी पंचक्रोशीतून भाविक, आवर्जून उपस्थिती लावतात.

RNINO-46973/1986 महासागर अकोला
मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१–८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

